**<u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>**

**<u>प्रेस नोट दि.१२/०८/२०१९</u>**

**<u>दि.११/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३६९/१९,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | धनंजय निगडे,वय-३५,रा.मैदनकरवाडी,चाकण,पुणे |
| **आरोपी** | कारमधील एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०८/२०१९ रोजी सकाळी १०/१० वा. जिजाऊ हॉटेल समारुन रोडचे कडेने पायी जात असताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रोडचे कडेने चालत जात असताना,त्यांना त्यांचे पाठीमागुन येणा-या रिक्षाचा धक्का लागल्याने ते रोडचे कडेला थांबलेल्या कारचे उजवे बाजुस धक्का लागुन खाली पडले. त्यावेळी सदर इसमाने फिर्यादी यांचेजवळ येवुन,त्यांना माझ्या कारचा उजव्या बाजुचा आरसा फुटला आहे त्याचे नुकसान भरपाई म्हणुन २,५००/- रुपये दे असे म्हणुन फिर्यादी यांचे शर्टच्या खिशातील ५,०००/- रु किंचा मोबाईल बळजबरीने काढुन घेवुन निघुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जे.कदम ९८२३६२४५८५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४५४/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | गिरीष पानसरे,वय-४६,रा.बोराडेनगर,वानवडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०८/२०१९ रोजी १९/०० ते दि.०३/०८/२०१९ रोजी सकाळी ०७/३० फ्लॅट नं.बी.२०४ नॅन्सी गार्डन सोसायटी,बोराडेनगर,वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील १,८२,०००/- रूपये रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण २,०६,०००/- किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. (फिर्यादी हे कामानिमित्त बाहेरगांवी गेल्याने त्यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गायकवाड ९५९४८४२११७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्या. पो स्टे ५५१/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३१(१)(क),१३४(ब) |
| **फिर्यादी** | गणेश चव्हाण,वय-४२ वर्ष,रा.शनिनगर चौक,दत्तनगर,आंबेगाव-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०८/२०१९ रोजी सकाळी ११/२० वा.पुर्वी साताराकडुन पुणेचे बाजुने येणारे मुबंई-बंगलोर हायवे रोडवर जांभुळवाडी दरी पुलापासुन १०० मीटर अंतरावर आंबेगाव-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने,त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे हॉटेल मध्ये काम करणारा कामगार पादचारी महेश अविनाश चव्हाण,वय-४० वर्ष,रा.फ्लॅट नं.१३, आदर्शनगर,चरकी, मुं. पो.साक्री,ता.साक्री,जि.धुळे हे रोडने पायी जात असताना,त्यास जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. एम.एस.देशमुख ९७६५३९०९४३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७०७/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | भारत भोसले, पोलीस हवालदार, चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | सुमित प्रभाकर ढोके,वय-२८ वर्षे,रा.सत्यकृपा कॉलनी,एमआयडीसी रोड,अमरावती (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०७/२०१९ रोजी १५/३० वा. रेन्जहिल्स सिफनी सोसायटी समोरील रोडवर व्ही.बी. कॅपिटल कन्स्ट्रक्शन जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सुमित प्रभाकर ढोके याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात स्वतः चालवुन, नमुद ठिकाणी अचानकपणे जोरात ब्रेक दाबुन तो दुचाकीसह खाली पडुन,त्यामध्ये गंभीर जखमी होवुन, स्वतःचे मुत्युस कारणीभुत झाला. (सदरचा गुन्हा हा अकस्मात मयत रजिस्टर वरुन दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.डी.दराडे ९४२०६६७७८९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे १४९/१९,भादविक ३०४(अ),मोव्हेॲक्ट १३४(अ)(ब), |
| **फिर्यादी** | राकेशकुमार सरोज,वय-३५,रा.गिरधरभवन,गुलटेकडी,पुणे |
| **आरोपी** | पिकअप टेम्पो चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०८/२०१९ रोजी १८/३० ते १८/४५ वा. मार्केटयार्ड पुणे येथील एनएससी गोडावुन बिल्डींग जवळ |
| **तपशिल** | यातील नमुद टेम्पो चालकाने त्याचे ताब्यातील पिकअप टेम्पोचे पाठीमागील दरवाजा उघडा अर्धवट उघडा ठेवुन,तसाच टेम्पो चालवुन,निष्काळजीपणाने नमुद ठिकाणी वळण घेतल्याने, फिर्यादी यांचेसोबत काम करणारा कामगार गोविंदकुमार सरोज यास टेम्पाचे दरवाजाच्या फटका लागल्यामुळे त्याचे कपाळावर डोळयाचे बाजुस,तसेच डोक्याचे मागे फटका बसल्या मुळे त्यास गंभीर स्वरुपाच्या जखमा करून,गोविंदकुमार टुलीचंद सरोज,वय-२५,रा.रायगड, तहसिल.कुडा,जि.प्रतापगड याचे मरणास कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पाटील ९८२३५६०३६० |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५५७/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-६१ वर्षे,धंदा-कुरीयर,रा.तरोडा-खुर्द,नांदेड |
| **आरोपी** | अनोळखी इसम "अंगाने सडपातळ,वय अंदाजे २० ते २२ वर्षे, अंगात पावसाळी काळे जॅकेट, डोक्यात जॅकेटची टोपी घातलेली, रंगाने काळा," (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि..१०/८/२०१९ रोजी सकाळी ०६/३० वा. मशिदचे बाजुला असलेले मोकळे जागे मध्ये नगर रोड येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे खाजगी ट्रॅव्हलचे बसमधुन उतरुन त्यांचेजवळील २९,२४,६५०/- रुपये रोख रक्कम असलेली सॅकचे बॅग ही येरवडा मशिदीचे शेजारी असलेल्या मोकळया जागेत ठेवुन लघुशंका करण्यासाठी गेले असताना,वरील नमुद वर्णनाचे अनोळखी इसमाने फिर्यादीचे पाठीमागुन येवुन,सदर रक्कम असलेली सॅकची बॅग ही उचलुन चोरुन घेवुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मंगेश भांगे ८८०५३३३०३३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**